International Journal of Advance and Applied Research (IJAAR)
Peer Reviewed Bi-Monthly
ISSN – 2347-7075
Impact Factor – 4.935
Vol.6 No.3 Jan – Feb 2019

# महाराष्ट्रातील सफाई कर्मचा–यांची स्थिती –एक दृष्टिक्षेप

कु.भारती सोपान तनपुरे
पीएच.डी.संशोधक
अर्थशास्त्र विभाग
भाउसाहेब संतुजी थोरात महविद्यालय, संगमनेर, जि.अ.नगर

**गोषवारा :**

भारतातील शहरीकरणाची, सामाजिक आणि आर्थिक बदलांची प्रक्रिया अत्यंत गतिशील आहे. वाढत्या शहरीकरणाबरोबर निर्माण होणा–या समस्या व प्रश्न सोडविण्यासाठी नगरपरिषदां तसेच महानगरपरिषदा या स्थानिक स्वराज्य संस्थांचा अविभाज्य घटक असून नगरपरिषद सामाजिक क्षेत्रात महत्वाची भूमिका बजावतात. वाढत्या नागरीकरणामुळे राज्याच्या शहरीभागातील स्वच्छताविषयक समस्या तीव्र बनल्या आहेत. हाताने सफाई काम करणे हा वंशपरंपरागत आणि जातीधिष्ठीत व्यवसायच राहिल्यामुळे पुर्वास्पृश्य समुहातील सफाई कर्मचा–यांचे सिमान्तीकरण अव्याहतपणे चालूच आहे. तसेच, त्यांच्या आर्थिक व सामाजिक परिस्थितीवर याचा विपरित परिणाम होत आहे.

**कळीचे शब्द :**

स्थायी कामयस्वरूपी अस्थायी, कंत्राटी पध्दती, ठेकेदारी पध्दती स्थानिक स्वराज्य संस्था, महानगरपरिषद, नगरपरिषद.

## प्रस्तावना :

भारतात वैदिक काळापासून ते आधुनिक काळापर्यंत भारतीय जनतेच्या कल्याणाचा विचार करणारी संस्था म्हणून स्थानिक स्वराज्य संस्थांकडे म्हणजेच

आजच्या महानगरपरिषदा आणि नगरपरिषदांचा उल्लेख केला जातो. जनतेच्या कल्याणाच्या दृष्टीने धोरण ठरविणा–या तसेच लोकशाही राष्ट्राची निर्मीती करुन लोकशाही शासन व्यवस्थेची पायाभरणी करण्याचे कार्य महानगरपरिषदा व नगरपरिषदा करतात. म्हणूनच स्वातंत्र्योत्तर काळामध्ये विकेंद्रीकरणाला महत्व देवून भारताने लोकशाही शासन पध्दतीचा स्वीकार केला. लोकशाही शासन प्रणालीमध्ये अंतिम सत्ता ही लोकांच्या हाती केंद्रित झालेली असून स्थानिक स्वशासन संस्था या प्रक्रियेमध्ये महत्वाची भूमिका बजावतात. म्हणूनच या संस्थांना लोकशाहीचा मूलाधार मानले जाते. महानगरपरिषदांचे आणि नगरपरिषदांच्या जनहिताच्या विविध कार्यापैकी महत्वाचे व लाभाचे कार्य म्हणजे जनतेला स्वच्छ परिसराचा लाभ घडवून देणे आणि हा लाभ जनतेला देणारा महत्वाचा घटक म्हणजे सफाई कर्मचारी होय. सर्वसाधारणपणे नगरपरिषदांतल हा घटक स्वत: दुर्गंधीमध्ये राहुन इतरांना स्वच्छ परिसराचा लाभ उपलब्ध करून देणारी, स्वच्छतेचे काम करणारी व्यक्ती म्हणजे सफाई कर्मचारी होय.

अर्थ आणि परिभाषा :

प्रा. सहाय यांनी आपल्या Eradication of untouchability and cast system या लेखात प्रा.गाडगिळांच्या मताला सहमती दर्शविली आहे. त्यांच्या मते जे अस्वच्छतेच्या कामाशी म्हणजेच गटारी, नाले साफ करणे, मानवी मैला वाहून नेणे किंवा साफ करणे इत्यादींशी संबंधीत असलेला घटक म्हणजे भंगी होय. तसेच प्रसिध्द अर्थशास्त्रज्ञ प्रा.धनंजयराव गाडगीळ यांनी सफाई कर्मचारी वार्गाचे अधिक विस्तृत विवेचन केले आहे. त्यांच्या मते, भंगी, मेहतर, मेघवाल, रूखी, वाल्मीकी, हलालखोर अशा जाती की ज्या परंपरेने मानवी विष्ठा वाहून नेण्याचे काम करतात. त्यामुळे मानवी समाजात त्यांना सर्वांत खालचा दर्जा दिला आहे.

भारतात भंगी हा शब्द अत्यंत खालच्या जातींतील व्यक्तींसाठी वापरला असल्याचे म्हटले जाते.

सफाई कर्मचारी या शब्दाच्या व्याख्येबाबत अनेक वादविवाद अढळतात. त्यांचा आधार कोणता, जात की व्यवसाय हेच अद्याप निश्चित झालेले नाही. थोडक्यात बदलत्या काळात इतर जातींचे लोक सफाई कामगार म्हणून नोकरी स्विकारू लागले आहेत. त्यामुळे दुसरे नाव म्हणजे सफाई कर्मचारी हा एक व्यवसाय आहे. असे म्हणता येइल. जात की व्यवसाय हा प्रश्न सतत वादाचा असला तरी हा व्यवसाय शहरांच्या वाढीतूनच संघटित झाला हे निर्विवाद दृष्टीने पाहता आधुनिक शहरांनी एका नव्या जातिसदृश्य गटाची निर्मिती केली हे विदारक सत्य आहे.

**महाराष्ट्रातील नगरपरिषदांतील सफाई कर्मचा–यांची स्थिती :**

महाराष्ट्रात सफाई कर्मचारी हा शब्द शुध्द निम्न किंवा खालच्या जातीतील व्यक्तींसाठी वापरला जात असल्याचे दिसून येते. महाराष्ट्रातील नगरपरिषदांमधील स्थानिक व प्रादेशिक सफाई कर्मचा–यांमध्ये भूमिगत गटारे, नाले साफ करणा–या कर्मचा–यांची अवस्था इतरांच्या तुलनेत हलाखीची असल्याचे दिसून येते. या कर्मचा–यांना प्रादेशिक भाषांमध्ये भंगी, वाल्मीकी, मेघवाल, रूखी, वणकर, हलालखोर, लालबेगी व डुमार या नावांनी ओळखले जाते. शासकिय परिभाषेमध्ये अस्वच्छ सफाई कर्मचारी म्हणून उल्लेख केला जातो. राज्यातील ५९ अनुसुचित जातींपैकी सफाई काम करणा–या नउ जाती सार्वजनिक तसेच, खाजगी क्षेत्रामध्ये काम करताना दिसतात. साफ सफाई करणा–या कर्मचा–यांच्या दैन्यावस्थेकडे लक्ष देण्याची नितांत आवश्यकता आहे.

गुजरातमधील नवसर्जन ट्रस्ट, हैद्राबाद येथील सफाई कर्मचारी आंदोलन व नवी दिल्लीतील नॅशनल कॅम्पेन ऑन दलित हयुमन राईटस यासरख्या संस्थांनी व या विषयावर काम करणा–या अंदोलकांनी सप्टेंबर २००१ मधील दक्षिण आफ्रिकेतील डर्बन कॉन्फरन्समध्ये, तसेच जानेवारी २००४ मध्ये मुंबईत भरलेल्या वर्ल्ड सोशल फोरमध्ये या विषयाला प्रकर्षाने वाचा फोडली. २००८ च्या आकडेवारीनुसार महाराष्ट्रात सफाई काम करणारी एकूण २७५३ घरे असून, यातील अधिकतर देशातील १४ राज्य आणि नेपाळ, पाकिस्थान या शेजारील राष्ट्रातून स्थलांतरीत झालेली आहेत. देशातील इतर राज्यांतील स्थलांतरीत झाालेल्यांपैकी अधिकतर कुटुंबे हि गुजरात हरयाणा, राजस्थान व उत्तर प्रदेशातील असून, पाकिस्तानातून आलेली ही कुटूंबे फाळणीपूर्वी भारतात स्थलांतरीत झालेली होती.

महाराष्ट्राच्या सहही प्रशासकिय विभागांमधून मिळालेलया आकडेवारीनुसार राज्यामध्ये सफाई श्रमिकांची एकुण २८७० घरकुले आहेत. राज्यताील २८७० घरकुलांपैकी ११० घरकुलांची या कामातून मुक्तता झालेली असून उर्वरीत २७६० घरकुले आजही विविध प्रकारची सफाई काम करीत आहेत. घरकुलांमधील लोकांची एकुण संख्या १६,५४० म्हणजे ४९ टक्के स्त्रिया आहेत. मुलांचे प्रमाण ५३८५ म्हणजे ३५.३ टक्के तर प्रौढ १०,२९० म्हणजे ६५.७ टक्के व्यक्तींनाच नोक–या आहेत व त्यापैकी बहुसंख्य ४१८२ म्हणजे ८५.९ टक्के हाताने सफाई काम करणारे आहेत. रोजगार असलेल्या प्रौढ व्यक्तींपैकी स्त्रीयांचे प्रमाण ३३.३ टक्के म्हणजेच १,३९२ इतके आहे. यापैकी बहुतांश स्त्रिया सफाई कर्मचारी आहेत. रोजगार असलेल्या पुरूषांची संख्या ३.२९४ आहे. परंतु यामध्ये देखील अधिकतर पुरूष सफाई कर्मचारी म्हणून काम करतात.

महानगरपरिषदांमधील सफाई कर्मचा–यांमधील भूमिगत गटारे साफ करणा–या कर्मचा–यांची अवस्था इतरांच्या तुलनेत हालाखीची दिसून येते. अनेक कर्मचारी असे काम करताना मृत्युमुखी पडल्याने सर्वोच्च न्यायालयाने या कमावर बंदी घातली. तरी देखील शहराच्या जुन्या व कोंदट रस्त्यांमधील तुंबलेली गटारे या कामगारांनाच साफ करावी लागतात. अशा वेळी त्यांना कुठल्याही प्रकारच्या आरोग्यरक्षक सुविधा पुरविल्या जात नाहीत. गढुळ, दुर्गंधीयुक्त पाण्याने चिंब भिजलेल्या कर्मचारी लाकांचा रोष टाळण्यासाठी बस व रेल्वेतून घरी जाण्याऐवजी नाईलाजाने चालत घरी जाणे पसंत करतो. तसेचच सफाइ्र काकमगार म्हणून एकदा रूजू झालेला कर्मचारी सफाई कामगार म्हणूनच निवृत्त होतो. क्वचित शिक्षीत सफाई कर्मचा–याला ढबती दिली जाते. कायमस्वरूपी स्थाई कर्मचारी अपूरे असल्यामुळे हैदराबाद पॅटर्ननुसार, सफाई काम कंत्राटी पध्दतीने राबविले जात असून परिणामी कंत्राटदारांची मनमानी वाढली आहे. हंगामी तत्वावर कामगारभरती करून त्यांची पिळवणूक करणा–या स्थायी कर्मचा–यांचे प्रमाण वाढत असल्याचे दिसून येते.

**महाराष्ट्रातील नगरपरिषदांमधील आणि सर्वोक्षित नगरपरिषदांतील सफाई कर्मचा–यांची सद्यस्थिती :**

वाढत्या नागरीकरणामुळे राज्याच्या शहरी भागातील स्वच्छताविषयक समस्या तीव्र बनल्या आहेत. सफाई काम करणे व आजदेखील जातिधिष्ठीत व वंशपरंपरागत व्यवसाय राहिला आहे. शहरीकरणाला अधुनिकतेची जोड मिळाल्यानंतर सफाईच्या विज्ञाननिष्ठ पध्दतीचा स्विकार होउन सफाई कर्मचा–यांना अधिक सन्माननीय संधी उपलब्ध व्हायला हव्या होत्या, परंतु

आजदेखील त्यांना मेहतर, भंगी, वाल्मीकी, रूखी, हलालखोर, केघवाल या नावाखाली गलिच्छ काम करण्यास भाग पाडले जात आहे.

**सफाई कर्मचा–यांसाठी नाविन्यपुर्ण प्रकल्प :**

सफाई कर्मचा–यांबाबतची सर्व पार्श्वभूमी पाहता जागतीक स्तरावर सल्लागार संस्था म्हणून नावारूपास आलेल्या डलबर्ग अडव्हाजर्स या संस्थेने कर्मचा–यांच्या पातळीवर उपाय विकासित करणे या उद्येशाने सफाई कर्मचा–यांसाठी नाविन्यपुर्ण उपायांबाबतच्या शिखर परिषदेचे आयोजन केले. या परिषदेतून पुढे विकसित होण्याची क्षमता असलेल्या चार संकल्पना पुढे आल्या आहेत.

१. सफाई कर्मचा–यांची नियुक्ती ही अनौपचारीक पध्दतीने न करता अधिकृत नोंदणीने करावी.
२. सफाई कामाच्या ठिकाणी सुरक्षिततेचे वातावरण आणि त्याची प्रक्रिया असावी.
३. सफाई कर्मचा–यांशी न्याय आणि सोप्या पध्दतीने समजण्याइतपत असे करार करणे.
४. सफाई कर्मचा–यांची उद्योजकता वाढीसाठी निर्माण करावी.

**सफाई कर्मचा–यांच्या मागण्या :**

सफाई कर्मचा–यांनी स्व:च्या हक्कासाठी व न्यायासाठी संघटनेमध्ये सहभागी होउन नव्याने स्थापन झालेल्या संघटनेने आयुक्तांकडे विविध मागण्या मांडल्या.

१. सफाई कर्मचा–यांचा दहा लाख रूपयांचा अपघाती ग्रुप विमा काढणे.
२. निवृत्तीनंतर सर्व रक्कम निवृत्तीच्या दिनांकास मिळाव्यात.

३. कर्मचा-यांच्या प्रश्नासंदर्भात दर ३ महिन्यांनी संघटने समवेत बैठक घ्यावी.

४. सर्व शासकिय व राष्ट्र्य सुट्टया लागू कराव्यात किंवा वेतन लागू करण्यात यावे.

५. १ नोव्हेंबर २००५ पासुन सेवेत रूजु झालेल्या कर्मचा-यांना जुनी पेन्शन योजना लागू करण्यात यावी.

६. सफाई कर्मचा-यांना १२ ते २४ वर्षे सेवा केल्यानंतर पदोन्नती मिळावी.

७. आरोग्य तपासणी दर ३ महिन्यात करण्यात यावी.

८. सफाई कर्मचा-यांना शिक्षणाच्या आधारावर पदोन्नती मिळावी.

९. सफाई कर्मचा-यांना हक्काची घरे देण्यावी यावी.

१०. कर्मचारी कुटुंबास कॅशलेस मेडिक्लेम पॉलिसी सुरू करण्यात यावी.

उपसंहार :

नगरपरिषद प्रशासनात सफाई कर्मचा-यांची भूमिका महत्वपुर्ण आहे. वाढत्या नागरिकरणामुळे शहरी भागातील समस्या उग्र बनल्या आहेत. शहरातील रस्ते स्वच्छ करण्यासाठी सफाई कर्मचा-याऐवजी आधुनिक सफाई यंत्राचा वापर करण्यात येणार आहे. त्यामुळे सफाई कर्मचा-यांमधील बेरोजगारीच्या प्रमाणात वाढ होणार आहे. थोडक्यात, त्यांना शासकिय नोकरी मिळण्याचा मार्ग बंद होणार आहे. ही समस्या गंभीर असून सफाई कर्मचा-यांवर्‍ अपासमारीची वेळ येवू नये म्हणून महानगरपरिषद आणि नगरपरिषदांनी कर्मचा-यांच्या समस्यांना प्राधान्य देण्या बाबत प्रयत्न करावेत जेणेकरून सफाई कर्मचा-यांची स्थिती सुधारण्यास मदत होईल.

संदर्भ :


१. बंग के.आर. २००५: भारतातील स्थानिक स्वशासन, विशेष संदर्भ महाराष्ट्र राज्य, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर पृष्ठ क्र.१

२. भागानगरे शिवाजी, २०१२: नांदेळ वाघाळा महानगरपालिकेतील सफाई कामगारांचे आर्थिक व सामाजिक अध्ययन १९९८–२००८ अप्रकाशित पीएच. डी प्रबंध, पृष्ठ क्र. २३.

३. छरोकर, एस के २०१०: समाज प्रबोधन प्रत्रिका, जातिव्यवस्थेचा पाया आधुनिक शहरातील विटाळणारे व्यवसाय व सफाई कामगार.

४. व्हेक, हिलॅरस व शैलेश दरोकार २००६: सोशिओ इकॉनॉमिक सर्वे ऑफ मॅन्युअल स्कॅव्हेंजर्स इन महाराष्ट्र टाटा सामाजिक विज्ञान संस्था, मुंबई.

५. इरूदायम, अलोसियस व जयश्री पी. भंगुबाई, दलित्रस इन दि वर्ल्ड ऑफ ग्लोबलायझेशन नॅशनल कॅम्पेन ऑन दलित हयुमन राइटस् इंडिया, नवी दिल्ली.